# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार , दि. १५ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२३ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

* आंतरराष्ट्रीय ग्राहकदिन.
* नियोजनदिन.

इ.स.पूर्व ४४ : ज्युलिअस सिझरचा खून झाला.
१८३१ : मराठीतील पहिले पंचांग छापले गेले.
१९२० : हॉकीपटू आर.फ्रान्सिस यांचा जन्म झाला.

सेन्सेक्स ७४,५६३.९२ -१,४७०.५० (१.९३%)
डॉलर ₹ ९२.३६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३८ | २० |
| दिल्ली | २९ | १९ |
| मुंबई | ३४ | २३ |
| नागपूर | ३८ | २१ |
| पुणे | ३६ | १८ |

**सुविचार**

आयुष्य हे एक दीर्घ धावपट्टू स्पर्धा आहे, जिथे धैर्य आणि संयम हेच विजयाचे मूलमंत्र आहेत.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३७ संध्या-६:३७

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६१,६३५/- २,७५,०००/-

# बगदादमधील अमेरिकन दूतावासावर मोठा हल्ला

## अमेरिका-इराण संघर्ष! ; हेलिपॅडवर क्षेपणास्त्र कोसळले



वृत्तसंस्था । वाशिंग्टन

**अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या लष्करी संघर्षाने तिसऱ्या आठवड्यात प्रवेश केला आहे. या युद्धामुळे मध्य पूर्वेतील तणाव वाढतच आहे. दरम्यान, शनिवार, १४ मार्च २०२६ इराकची राजधानी बगदादमधील अमेरिकन दूतावासाच्या हेलिपॅडवर मोठा क्षेपणास्त्र हल्ला झाला. या घटनेनंतर, दूतावासाच्या कंपाऊंडवरून काळ्या धुराचे मोठे लोट उठताना दिसले.**

असोसिएटेड प्रेसच्या मते, बगदादमधील धुराने भरलेल्या अमेरिकन दूतावासाच्या छायाचित्र समोर येत असताना, संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील फुजैराह बंदराजवळील एका तेल सुविधेतही आग लागली. इराणी ड्रोनचा ढिगारा पडल्याने ही आग लागल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटना संपूर्ण प्रदेशात लष्करी हालचाली वाढलेल्या आहेत.

**अमेरिका आणि इराणने तयारी केली मजबूत**

दरम्यान, अमेरिकेने मध्य पूर्वेतील आपली लष्करी उपस्थिती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकन अधिकाऱ्याचा हवाल्याने वृत्त आहे की, सुमारे २,५०० अतिरिक्त मरीन आणि एमफीबियस असॉल्ड जहाज या प्रदेशात पाठवले जात आहे.

दरम्यान, इराणने इस्त्रायल आणि अनेक आखाती अरब देशांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरू ठेवले आहेत. त्यांनी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे होर्मुझचे सामुद्रधुनी देखील प्रभावीपणे बंद केले आहे, ज्यातून मोठ्या प्रमाणात तेलची वाहतूक होते.

### डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिली धमकी

शुक्रवार, १३ मार्च २०२६ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिकन सैन्याने इराणच्या तेल निर्यातीचे प्रमुख केंद्र मानल्या जाणाऱ्या खार्ग बेटावरील लष्करी तळ उद्ध्वस्त केले आहेत. ट्रम्प यांनी अशी धमकीही दिली की, जर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर हल्ले सुरू ठेवले तर इराणची तेल पायाभूत सुविधा पुढील लक्ष्य असेल. यावर, इराणच्या संसदेच्या सभापतींनी अशी धमकी दिली की, अशा हल्ल्यांना आणखी मोठ्या ताकदीने तोंड दिले जाईल.

# अमेरिकेकडून इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनींवर १ कोटींचे बक्षीस जाहीर



वृत्तसंस्था । वॉशिंगटन

**इराण – इस्त्राइल यांच्यातील संघर्ष सातत्याने वाढताना दिसत आहे. गेल्या काही १६ दिवसांपासून सुरू असलले युद्ध थांबायचे नाव घेत नाहीये. युद्धात इराणला लक्ष्य करण्यात इस्त्राइलची साथ अमेरिका देत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे इराणाला इशारा देताना दिसत आहेत. अशातच आता अशी एक बातमी समोर आली आहे, ज्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे.**

खरेतर या युद्धाचा फटका जगभरातील अनेक देशांना बसला आहे. इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला (पान २ वर)

युद्धाची झळ भारताला देखील बसली आहे. इराणने होर्मुज सागरीमार्ग बंद केल्याने निर्यात आणि आयात थांबली आहे. भारतात एलपीजी गॅस सिलेंडर आणि कच्चा तेलाचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे युद्ध आखातात पण झळ मात्र भारतात अशा प्रकारचे चित्र असून याबद्दल संताप व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### चीन सीमेवर कर्तव्य बजावताना पाटणचा सुपुत्र शहीद

**पाटण ।** सातारा जिल्हा हा शौर्य आणि बलिदानाची परंपरा असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. याच मातीतील आणखी एका सुपुत्राने देशाच्या रक्षणासाठी आपले सर्वोच्च बलिदान दिले आहे. पाटण तालुक्यातील पिंपळोशी गावचे सुपुत्र बाळकृष्ण विलासराव निकम (वय ४२) यांना सिक्कीममधील चीन सीमेवर ऑपरेशन स्नो लेपर्ड अंतर्गत कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले. तब्बल २३ वर्षे भारतीय सैन्यात सेवा बजावल्यानंतर, निवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाच त्यांनी मातृभूमीसाठी प्राण अर्पण केले.

### बेपत्ता व्यक्तीप्रकरणी ५ राज्यांना नोटीस

**नागपूर ।** देशातील बेपत्ता व्यक्तींच्या वाढत्या संख्येवर आणि मानवी तस्करीच्या गंभीर परिस्थितीवर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने कडक पावले उचलली आहेत. बिहार, ओडिशा, तेलंगण, महाराष्ट्र आणि राजस्थान या पाच राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि पोलीस महासंचालकांना आयोगाने नोटिसा बजावल्या असून, दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. ९ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका मीडिया रिपोर्टची दखल घेत आयोगाने ही सुमोटो कारवाई केली आहे.

### वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रोची घोषणा

**मुंबई ।** मुंबईच्या वाहतुकीचे चित्र पूर्णपणे बदलून टाकणारा एक महत्त्वाकांक्षी निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २३,४८७ कोटी रुपयांच्या खर्चाच्या वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या नवीन मेट्रो मार्गिकेची घोषणा करण्यात आली हे. या प्रकल्पामुळे उपनगरातून थेट दक्षिण मुंबईत जाणाऱ्या लाखो प्रवाशांचा प्रवास आता अधिक वेगवान, सुखकर आणि प्रदूषणमुक्त होणार आहे.

# ...तोपर्यंत १२ दिवस आम्ही सामान्य माणसांनी तुमच्या घरी जेवायला यायचं का?

## रोहिणी खडसेंनी चित्रा वाघ यांना चांगलचं सुनावलं

वृत्तसंस्था । मुंबई



**भाजप आमदार चित्रा वाघ यांनी एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू असल्याचे विधान केले होते. आता या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे यांनी जोरदार प्रहार चित्रा वाघ यांच्यावर केला आहे.**

चित्रा वाघ यांच्या विधानाचा समाचार घेत रोहिणी खडसे यांनी सिलिंडर येत नाही, तोपर्यंत १२ दिवस आम्ही सामान्य माणसांनी तुमच्या घरी जेवायला यायचं का? असा संतप्त सवाल चित्राताई यांना केला आहे. रोहिणी खडसे यांनी आपल्या एक्स हँडलवर या संदर्भात ट्वीट केले आहे. त्यांनी केलेल्या या ट्वीटवर आता चित्रा वाघ काय प्रत्युत्तर देणार हे पाहावे लागणार आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आखाती देशांमधील युद्धाची झळ भारताला सोसावी लागत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे इराणने सामुध्रधुनीवर कच्चे तेल आणि एलपीजी पुरवठा (पान २ वर)

# उत्तर कोरियाने पुन्हा डागले क्षेपणास्त्र

## जपान सतर्क, पूर्व आशियात तणाव वाढण्याची शक्यता

वृत्तसंस्था । जपान

**जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने सोशल मीडियावरील एक्स या माध्यमातून या घटनेची माहिती दिली. पोस्टमध्ये म्हटले आहे की, उत्तर कोरियाने पूर्व दिशेकडे समुद्राच्या दिशेने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. सध्या या घटनेची अधिक माहिती गोळा केली जात असून नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहनही सरकारने केले आहे.**



उत्तर कोरिया यापूर्वीही अनेक वेळा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी करत असल्यामुळे शेजारी देश आणि आंतरराष्ट्रीय समुदायात चिंता व्यक्त होत असते. विशेषतः जपान आणि दक्षिण कोरिया हे देश अशा चाचण्यांवर बारकाईने लक्ष ठेवून असतात.

पूर्व आशियात पुन्हा एकदा तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण उत्तर कोरियाने समुद्राच्या दिशेने संशयास्पद आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेला जपान सरकारनेही दुजोरा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने सोशल मीडियावरील एक्स या माध्यमातून या घटनेची माहिती दिली. पोस्टमध्ये म्हटले आहे की, उत्तर (पान २ वर)

# गॅस सिलिंडर पुरवठ्यावर आता नियमांचा उतारा

वृत्तसंस्था । मुंबई

## एलपीजी पुरवठ्याबाबत नियमावली जारी

**सिलेंडरचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी व कुत्रिम टंचाईला आळा घालण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने गॅस वितरणाबाबत नियमावली जारी करण्यात आली. गॅस पुरवठ्याचे नियोजन कसे करावे या संदर्भात निर्देश दिले आहेत. प्राधान्यक्रम ठरण्यात आला. शाळा वसतिगृह शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम, शासकीय खानावळ, मद्यान्ह भोजन, अंगणवाडी या सर्व संस्थांना शंभर टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. त्याचबरोबर उपाहारगृह ७० टक्के पुरवठा, औषध उद्योग ५० टक्के , बीज प्रक्रिया ५० टक्के, मस्य पालन ५० टक्के सिलेंडर पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले.**

**गॅस सिलेंडर एजेंसीला या सर्व संदर्भात दररोजचा अहवाल सादर**

महाराष्ट्रात बहुतेक भागात गॅस तुटवडा जाणवत आहे. याची झळ अनेक शहरांना बसली आहे. सर्वत्र गॅस एजन्सीच्या कार्यालयाबाहेर ग्राहक सिलेंडरसाठी तासंतास रांगेत उभे राहिले चित्र बघायला मिळाले. आहेत. केवळ सर्वसामान्यच नाही तर राज्यातील घरगुती ग्राहकांसोबत वसतिगृह, रुग्णालयातील आश्रमशाळा, कँटिन, अंगणवाड्यासह अनेक ठिकाणी गॅस टंचाई निर्माण होऊ नये यासाठी शासनाने पावले उचलून परिस्थिती सामान्य करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी सरकारने देशात एस्पा लागू करण्यात आला आहे. गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी अन्न पुरवठा विभागाची भरारी पथकं अनेक ठिकाणी कारवाई (पान २ वर)



# खर्ग आयलँडवर शक्तिशाली हवाई हल्ला केल्याचा ट्रम्प यांचा दावा

## मार्गात हस्तक्षेप केल्यास कठोर निर्णय घेण्याचाही दिला इशारा

वृत्तसंस्था । वॉशिंगटन

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या महत्त्वाच्या खर्ग आयलँडवर शक्तिशाली हवाई हल्ला केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यात बेटावरील सर्व इराणी लष्करी लक्ष्य पूर्णपणे नष्ट करण्यात आल्या असून, तेलाशी संबंधित पायाभूत सुविधा मात्र मुद्दाम सुरक्षित ठेवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले आहे.**



ते पुढे म्हणाले, आमची शस्त्रे जगाला माहित असलेली सर्वात शक्तिशाली आणि अत्याधुनिक आहेत. परंतु, सभ्यतेच्या कारणास्तव, मी बेटावरील तेल पायाभूत सुविधा नष्ट न करण्याचा निर्णय घेतला आहे. जर इराण किंवा इतर कोणीही स्ट्रेट ऑफ होर्मुझ मार्गावरील जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीत कोणताही अडथळा आणण्याचा प्रयत्न झाला, तर अमेरिका आपला सध्याचा निर्णय तात्काळ बदलू शकते. या मार्गातून जगातील मोठ्या प्रमाणावर तेल वाहतूक होते. त्यामुळे या मार्गाची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या समुद्री मार्गावरून जाणाऱ्या जहाजांच्या सुरक्षेसाठी अमेरिका लवकरच विशेष संरक्षण व्यवस्था उभी करणार आहे. (पान २ वर)

# भाजपचे माजी नगरसेवक-मोगलीबाबा गटात तुफान हाणामारी

## महानगरपालिकेची निवडणूक अन् ठेक्यांच्या वादाची किनार

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील शनिपेठ पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या भाजपच्या माजी नगरसेवकासह त्यांच्या समर्थकांना पोलिसांसमोरच दुसऱ्या गटाने बेदम मारहाण केली. या राड्यामुळे पोलीस ठाण्याच्या आवारातच कुस्तीचा आखाडा भरला होता. माजी नगरसेवक कैलास सोनवणे आणि राहुल ठाकरे उर्फ मोगली बाबा यांच्यात महानगरपालिकेच्या निवडणुका आणि ठेक्यांच्या वादातून मारहाण झाल्याची चर्चा आहे. यामध्ये तीन जण जखमी झालेले असून काही शस्त्र ही जप्त करण्यात आलेली आहे.**

जळगाव शहरातील वाल्मिक नगरात भाजपचे माजी नगरसेवक कैलास सोनवणे यांच्या कार्यकर्त्यांचा आणि तरुणांच्या एका गटात किरकोळ वाद झाला होता. या वादाची तक्रार देण्यासाठी दोन्ही गट शनिपेठ पोलीस ठाण्यात पोहोचले होते.

पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर आणि इतर कर्मचारी तक्रार नोंदवून घेत असतानाच, राहुल ठाकरे उर्फ मोगली बाबा हा आपल्या साथीदारांसह पोलीस ठाण्यात घुसला. त्यांनी काहीही विचार न करता थेट कैलास सोनवणे आणि त्यांच्या दोन साथीदारांवर हल्ला चढवला. दरम्यान, या वादाला राजकीय आणि व्यावसायिक संघर्षाची मोठी किनार आहे. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, महानगरपालिकेच्या निवडणुकीत माजी नगरसेवक कैलास सोनवणे यांची मुलगी आणि राहुल ठाकरे उर्फ मोगली बाबा याची पत्नी एकमेकींच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात होत्या. तेव्हापासून या दोन गटांत तीव्र राजकीय वैमनस्य आहे. त्यातच महानगरपालिकेच्या ठेक्यावरूनही त्यांच्यात वाद सुरू असल्याची चर्चा आहे.

**पोलीस अधीक्षकांची घटनासस्थळी भेट**

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी तातडीने शनिपेठ पोलीस (पान २ वर)

### ➤ पोलिसांसमोर फ्री-स्टाईल हाणामारी

पोलीस ठाण्याच्या परिसरातच दोन्ही गट एकमेकांना भिडल्याने प्रचंड गोंधळ उडाला. सोनवणे यांच्या कार्यकर्त्यांनीही प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केल्याने पोलीस ठाण्यात फ्री-स्टाईल हाणामारी झाली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी बळाचा वापर करत दोन्ही गटातील कार्यकर्त्यांना पांगवले. दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव कैलास सोनवणे यांना तात्काळ पोलीस वाहनातून सुरक्षितस्थळी हलवण्यात आले.

# सिंहगडच्या विद्यार्थ्यांचा वनवास संपला! राज्य सरकारचा मोठा निर्णय

वृत्तसंस्था । पुणे

**सिंहगड दंत महाविद्यालय आणि रुग्णालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनामुळे वाऱ्यावर पडलेल्या शेकडो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या महाविद्यालयातील पदवी (बीडीएस), पदव्युत्तर पदवी (एमडीएस) आणि इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर २४ खासगी विनाअनुदानित दंत महाविद्यालयांमध्ये स्थलांतरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय दि. १२ मार्च रोजी जारी केला आहे. यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून चिंतेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सिंहगड दंत महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनची संलग्नता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने रद्द केली आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक विस्कळीतपणा आणि विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता विद्यापीठाने (पान २ वर)

शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



# संपादकीय

## लाचखोरीला लगाम घाला

सध्या देशाच्या आणि जगाच्या अर्थव्यवस्थेसमोर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. अगदी अस्थिर आणि अनिश्चित असे वातावरण आहे. त्यामुळे केंद्र सरकारची व सर्व राज्यांची जबाबदारी अधिकच वाढली आहे. तिचे निर्वहन प्रामाणिकपणे करणे आवश्यक असताना राज्यांकडून बेजबाबदारपणाचा आणि बेफिकिरीचाच कारभार पाहायला मिळतो आहे. विविध योजना जाहीर केल्या जात आहेत. त्या कल्याणकारी असेल तर ठीक, पायाभूत सुविधा अथवा दीर्घकालीन लाभ देणाऱ्या योजना असतील तर त्यालाही ना नाही; तथापि, राज्यांकडून सरसकट फुकटात वाटप कार्यक्रम चालू आहे. राज्ये आणि तेथील राजकारणी त्यांच्या कथित योजनांना कितीही आकर्षक आणि भावनेला हात घालणारी नावे देत असलीत तरी अंतत: त्यांच्याकडून जे दिले जाते आहे तो लाचेचाच प्रकार असून ही लाच राजरोसपणे आणि गाजावाजा करत दिली जाते आहे. राज्यांचा आणि देशाचा विकास करावयाचा असेल आणि देशाला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर जाऊ द्यायचे नसेल तर नीती आयोग म्हणते त्याप्रमाणे आर्थिक शिस्त अंगिकारावी लागेलच, त्यातही सरकारी लाचखोरीला प्रथम लगाम घालावा लागेल. दुर्दैवाने हेच होणे शक्य नसल्याचे दिसते आहे. निवडणुकांच्या सुमारास राजकीय पक्षांकडून मतदारांना आमिष दाखवले जाते. पंतप्रधानांनी स्वत: या आमिषांना व त्यासंदर्भातील घोषणांना रेवडी संस्कृती म्हणून हिणवले होते. गमतीचा भाग असा की खुद्द त्यांच्याच पक्षाची सरकारे असणाऱ्या राज्यांनीही ही रेवडी संस्कृती पावन करून घेत तिचा स्वीकार केला. मध्य प्रदेश आणि राजस्थान ही राज्ये त्याची ठळक उदाहरणे. महाराष्ट्रानेही विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हाच रेवडीचा मार्ग पत्करला. रेवडीची लाचखोरी किती शिगेला गेली आहे त्याची बोलकी आकडेवारी समोर आली आहे. तमिळनाडूसाठी हे वर्ष निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे तेथील द्रमुक सरकारने आपल्या अर्थसंकल्पात तब्बल ९९ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही सगळीच रक्कम जनतेला म्हणजेच मतदारांना विविध योजनांच्या माध्यमातून जे काही मोफत द्यायचे आहे.

# भुसावळमध्ये गॅस एजन्सींची प्रशासनाकडून पाहणी

## नागरिकांनो, अफवांवर विश्वास ठेवू नका ; पुरवठा विभागाचे आवाहन

प्रतिनिधी । भुसावळ

**सध्याच्या आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर गॅस, पेट्रोल व डिझेल यांसारख्या जीवनावश्यक इंधनांच्या उपलब्धतेबाबत नागरिकांमध्ये कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये, तसेच पुरवठा व्यवस्था सुरळीत राहावी या उद्देशाने प्रशासनाने खबरदारीची पावले उचलली आहेत. भुसावळ तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभागाच्या पथकाने आज भुसावळ शहरातील विविध गॅस एजन्सींना भेटी देऊन साठा व वितरण व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.**



जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार सध्या जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याचा दररोज आढावा घेतला जात आहे. नागरिकांना गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत आणि नियमितपणे उपलब्ध राहावा. तसेच कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासन विशेष लक्ष ठेवून आहे. याच अनुषंगाने भुसावळ तालुक्यातील विविध गॅस एजन्सींमध्ये प्रत्यक्ष जाऊन उपलब्ध साठा, वितरण प्रक्रिया, ग्राहकांना होणारी सेवा आणि पुरवठ्याची नियमितता याची सविस्तर तपासणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान भुसावळ येथील अमित गॅस एजन्सी, मदन राजाराम बोरकर गॅस एजन्सी, वर्षा गॅस एजन्सी, धनश्री गॅस एजन्सी तसेच भुसावळ रेल्वे सोसायटी संचालित गॅस एजन्सी येथे भेट देऊन अधिकाऱ्यांनी साठ्याची स्थिती तपासली. एजन्सींमध्ये उपलब्ध गॅस सिलिंडर्सचा साठा, वितरणासाठी असलेली व्यवस्था, ग्राहकांची नोंदवही, वितरणाचे वेळापत्रक तसेच सुरक्षिततेच्या उपाययोजना यांची सखोल पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान पुरवठा निरीक्षण अधिकारी रोषणा रेवतकर यांनी एजन्सी चालकांशी संवाद साधून सध्याच्या साठ्याची माहिती घेतली आणि आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, राज्यभरात गॅस सिलिंडर्सचा पुरवठा सुरळीत सुरू असून कोणतीही टंचाई नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

नागरिकांनी गरजेपुरतेच गॅस सिलिंडर्स घ्यावेत व अनावश्यक साठा करून इतरांना अडचण निर्माण होईल, असे वर्तन करू नये, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

काही ठिकाणी अफवांमुळे नागरिकांकडून अनावश्यक साठा करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले असून अशा प्रकारांवर प्रशासन लक्ष ठेवून आहे. तसेच गॅस एजन्सींना देखील नियमितपणे वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्राहकांना वेळेवर गॅस सिलिंडर मिळावा, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी आणि कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, प्रशासनाकडून इंधन पुरवठ्याचा दैनिक आढावा घेतला जात असून भुसावळ तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नसून शांतता व संयम राखण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या पाहणी मोहिमेदरम्यान पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती रोषणा रेवतकर यांच्यासह पुरवठा विभागातील संबंधित कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाकडून आगामी काळातही अशाच प्रकारे वेळोवेळी तपासण्या करून पुरवठा व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### ➤ शांतता, संयम राखा

भुसावळ तालुक्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून गॅस एजन्सींना देखील नियमितपणे वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. तसेच शांतता व संयम राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात वस्तू ओळखा उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वस्तू ओळखा हा माहितीपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक मुकेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विविध दैनंदिन वापराच्या वस्तू दाखवून त्या वस्तूंवरील उत्पादन तारीख, मुदत समाप्ती, वजन, उत्पादक कंपनीचे नाव याची माहिती कशी तपासावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कोणतीही वस्तू खरेदी करताना बिल घेणे, मुदत संपलेली वस्तू टाळणे आणि योग्य माहिती पाहणे किती आवश्यक आहे. याबद्दल विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. या उपक्रमात पर्यवेक्षिका शितल कोळी यांनी निरीक्षण केले, तर विद्यार्थ्यांना उपक्रमाचे महत्त्व आणि जागरूक ग्राहक होण्याबाबत रूपाली आव्हाड यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक हक्कांविषयी जागरूकता निर्माण होऊन ते भविष्यात जबाबदार नागरिक बनण्यास प्रेरणा मिळते.

# पान १ वरुन

### अमेरिकेकडून इराणचे सर्वोच्च......

अली खामेनी यांना ठार करण्यात आले. एवढेच नाही तर हल्ल्यात त्यांच्या कुटुंबातील अनेकांचा मृत्यू झाला. खामेनी यांच्या मृत्यूनंतर संघर्ष आणखी वाढला आहे. खामेनी यांच्या जागी त्यांचा मुलगा मोजतबा खामेनी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानंतर आता अमेरिकेने थेट धमकी दिली आहे.

### उत्तर कोरियाचे पुन्हा......

कोरियाने पूर्व दिशेकडे समुद्राच्या दिशेने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. सध्या या घटनेची अधिक माहिती गोळा केली जात असून नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहनही सरकारने केले आहे. या घटनेनंतर जपानमध्ये सुरक्षा यंत्रणा तातडीने सक्रिय करण्यात आली आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन जपानी प्रशासनाने क्षेपणास्त्र प्रक्षेपणाच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवले आहे. या प्रकरणावर लक्ष ठेवण्यासाठी संरक्षण आणि आपत्कालीन विभागांना सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची यांनी या परिस्थितीचा आढावा घेतला आहे. त्यांनी संबंधित विभागांना तातडीने माहिती गोळा करण्यास सांगितले आहे. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सनाए ताकायची यांनी नुकत्याच झालेल्या फेब्रुवारी २०२६ मधील सार्वत्रिक निवडणुकीत मोठा विजय मिळवला होता. त्या निवडणुकीनंतर त्यांनी जपानच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले होते. जपानी भूभागाचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्य टिकवणे हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, जगातील राजकीय परिस्थिती आधीच तणावपूर्ण बनली आहे. पश्चिम आशियात इराण आणि इस्रायल यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत आता पूर्व आशियातही उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र चाचणीमुळे तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या या क्षेपणास्त्राचे नेमके अंतर, ते कुठे पडले आणि त्याचा संभाव्य धोका काय आहे, याची माहिती अधिकृतपणे समोर आलेली नाही. मात्र जपान सरकार परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे आणि आवश्यक त्या उपाययोजना करत आहे. जागतिक पातळीवर आधीच सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर उत्तर कोरियाच्या या हालचालीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

### खर्ग आयलँडवर शक्तिशाली......

इराण किंवा इतर कोणत्याही देशाने या मार्गात हस्तक्षेप केल्यास कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. खर्ग बेट का महत्त्वाचे मानलं जातं? - इराणच्या उत्तरेकडील पर्शियन आखातात असलेले खर्ग बेट हे देशाच्या तेल निर्यातीचे सर्वात महत्त्वाचे केंद्र मानले जाते. या बेटातून इराणच्या कच्च्या तेलाच्या निर्यातीपैकी सुमारे ९० टक्के निर्यात केली जाते. हे बेट हॉर्मुझची सामुद्रधुनीपासून सुमारे ४८३ किलोमीटर उत्तर-पश्चिमेला असून इराणच्या मुख्य भूभागापासून जवळपास २४ किलोमीटर अंतरावर आहे. खर्ग बेट हे उत्तर पर्शियन आखातात, इराणच्या मुख्य भूमीच्या किनाऱ्यापासून सुमारे २५ ते ३० किमी अंतरावर आहे. ते बुशेहर बंदराजवळ आहे. खर्ग बेट इराणच्या सुमारे ९० ते९५% कच्च्या तेलाच्या निर्यातीसाठी प्राथमिक टर्मिनल म्हणून काम करते. या बेटाचा गोड्या पाण्याचा पुरवठा आहे. आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या अहवालानुसार, या बेटावर दररोज सुमारे ७० लाख बॅरल तेल जहाजांवर लोड करण्याची क्षमता आहे.

### गॅस सिलेंडर पुरवठ्यावर......

करत आहेत. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने नुकतेच एक परिपत्रक काढले. १३ मार्च रोजी प्रत्येक जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थासह इतर अत्यावश्यक सेवांसाठी घरगुती गॅसच्या पुरवठ्याविषयी त्यामध्ये निर्देश देण्यात आले आहे. त्यामध्ये प्राधान्यक्रम ठरविण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळ, वसतिगृहे, शासकीय खानवळ, मध्यान्ह भोजन योजना, अंगणवाडी, शैक्षणिक संस्थातंर्गत चालविल्या जाणाऱ्या खानावळी आदिंना एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याचे आदेश दिले. या ग्राहकांना होणार शंभर टक्के गॅस पुरवठा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्मशानभूमि, वृद्धाश्रम, अनाथाश्रम या सार्वजनिक सेवांसाठी १०० टक्के गॅस पुरवठा करण्यात येईल. तसेच उपहारगृहे, संरक्षण क्षेत्र, शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, रेल्वे, हवाई वाहतूक, पोलीस आणि तुरुंग यांना ७० टक्के, तर एसटी महामंडळ, औषध उद्योग, बीज प्रक्रिया, मत्स्यपालन संस्थां करीता ही मर्यादा ५० टक्के आहे. या प्रमाणे गॅस वितरणाचे प्रमाणीकरण करून पुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न सरकारकडून कला जात आहे. शासकीय नियमावली पुढीलप्रमाणे : रुग्णालये १०० टक्के, शैक्षणिक संस्था १०० टक्के, सार्वजनिक सेवा १०० टक्के, स्मशानभुमी १०० टक्के, वृद्धाश्रम १०० टक्के, अनाथश्रम १०० टक्के, उपहारगृहे ७० टक्के, संरक्षण क्षेत्र ७० टक्के, शासकीय व सार्वजनिक क्षेत्र ७० टक्के, रेल्वे ७० टक्के, हवाईवाहतुक ७० टक्के, पोलिस-तुरुंग ७० टक्के, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ५० टक्के, मत्स्यपालन ५० टक्के, औषध उद्योग ५० टक्के, बीज प्रक्रिया ५० टक्के,

### ...तोपर्यंत १२ दिवस......

थांबवला आहे. तसेच इतर आयात निर्यातही बंद केली आहे. त्यामुळे गॅस सिलेंडर्सची टंचाई निर्माण झाली असून, काहीजणांकडून सिलेंडर्स ब्लॅकने दिले जाण्याचे धक्कादायक प्रकार समोर आलेले आहेत.

### सिंहगडच्या विद्यार्थ्यांचा......

भारतीय दंत परिषदेकडे या विद्यार्थ्यांच्या स्थलांतराचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावावर शासनाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता आणि पसंतीक्रमानुसार इतर महाविद्यालयांत त्यांचे वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रक्रियेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे सक्षम प्राधिकरण म्हणून काम पाहणार आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ प्रवेशावेळी मिळणारे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती आणि शिष्यवृत्तीचे लाभ नव्या महाविद्यालयातही कायम राहतील, असे शासनाने स्पष्ट केले आहे. तसेच, संबंधित संस्थांना या विद्यार्थ्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क घेता येणार नाही आणि विद्यापीठालाही या वाटप प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारता येणार नाही. या निर्णयामुळे सिंहगड विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्यापासून वाचले असून, आता लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर महाविद्यालय वाटपाची प्रक्रिया सुरू होणार आहे.

### भाजपचे माजी नगरसेवक......

ठाण्यात धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. या घटनेनंतर शहरात तणाव निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे आणि वाल्मिक नगर परिसरात राज्य राखीव पोलीस दलाचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शनिपेठ पोलीस ठाण्यात लोकप्रतिनिधीवर झालेला हा हल्ला जळगावात गुन्हेगारी वाढल्याचे झोतक आहे.

# टिटवी सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालयात जागतिक महिला दिन उत्साहात

प्रतिनिधी । पारोळा

**कै.उत्तम नामदेव पाटील सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय टिटवी, ता. पारोळा यांच्या संयुक्त विद्यमानाने आठ मार्च रोजी जागतिक महिला दिन, महिला मेळावा, महिला वाचक मेळावा, ग्रंथ प्रदर्शन, कविता लेखन व वाचन, स्पर्धा क्रिकेट स्पर्धा आदी कार्यक्रम घेऊन जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**




सर्वप्रथम प्रचिती पाटील, आशा पाटील, सुदर्शन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन वंदन करण्यात आले व विविध कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी डॉ. दीप्ती नेरपगार या होत्या. सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले. सकाळी नऊ ते दहा या वेळात कविता लेखन व वाचन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर दहा ते बारा या वेळात महिला मेळावा व महिला वाचक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात वंदना पाटील, अलका न्हावी, सिंधुबाई पाटील, सुनीता पाटील, निर्मला पाटील, विमल माळी व संस्थेचे ग्रंथपाल सुनीता पाटील, संस्थापक अध्यक्ष, सचिव व कार्यकारी संचालक, ज्येष्ठ विचारवंत, ज्येष्ठ समाजसेवक, व्याख्याते विमल माळी व संस्थेचे ग्रंथपाल सुनीता पाटील, लीलाधर पाटील यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप सुदर्शना पाटील यांनी केला.

कविता लेखन व वाचन स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तसेच कल्याणी पाटील, हर्षदा कावेरी पाटील, अश्विनी पाटील, श्रद्धा पाटील, निकिता पाटील, आदिती पाटील, तेजस्विनी पाटील, गायत्री पाटील, दिव्या पाटील, प्रियंका पाटील, स्वप्नाली पाटील यांनी लेखन व वाचन स्पर्धेत भाग घेतला. त्यानंतर बारा ते दोन या वेळात मुलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यानंतर पाच वाजेपर्यंत ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यानंतर बक्षीस वितरणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे डॉ. शुभम नेरपगार यांनी केले.

## बहिणाबाई चौधरी विद्यापीठाच्या संघाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार

प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेत आयोजित राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर २०२५ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत सर्वोत्कृष्ट विद्यापीठ हा मानाचा पुरस्कार पटकावला. दहा दिवस चाललेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी झिप लाईनिंग, स्काय सायकलिंग, ट्रेकिंग, वॉल क्लायंबिंग, रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग यांसारख्या साहसी उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही उत्कृष्ट सादरीकरण केले. या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

# नंदुरबारमध्ये ६७ लाखांचे चेक बाऊन्स; महावितरणची वक्रदृष्टी

प्रतिनिधी । नंदुरबार

**वीजबिल थकल्यावर होणारी कारवाई टाळण्यासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी अनेकदा ग्राहकांकडून महावितरण कंपनीला थकलेल्या रकमेच्या बिलापोटी धनादेश दिला जातो. मात्र, पुढे हे धनादेश वटतच नसल्याने अडचणी निर्माण होतात. मात्र, आता असे धनादेश न वटविणाऱ्या (चेक बाऊन्स) ग्राहकांवर महावितरणची वक्रदृष्टी पडली आहे.**



थकित वीजबिलापोटी चेक बाऊन्स झालेल्या ग्राहकांवर आता महावितरण थेट फौजदारी गुन्हा दाखल करणार असून, तसे होऊन गुन्हा सिद्ध झाल्यास संबंधित ग्राहकाला दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकणार आहे. वीज बिलाचा चेक बाऊन्स करणाऱ्या ग्राहकांबाबत महावितरण कंपनीने घेतलेल्या या कडक पवित्र्यामुळे ग्राहकांना आता केवळ प्रशासकीय कारवाईच नव्हे तर कायदेशीर दणकाही सहन करावा लागणार आहे. यामुळे अशा ग्राहकांच्या धास्तीत वाढ झाली आहे. महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या ११ महिन्यांच्या कालावधीत एकट्या जळगाव परिमंडळात वीज ग्राहकांनी २ कोटी ९४ लाख ६९ हजार ४२३ रुपयांच्या रकमेचे धनादेश दिले होते. त्यातील १,९४४ धनादेश वटलेच नाहीत. यामध्ये एकट्या नंदुरबार जिल्ह्यातील ६७ लाख २१ हजार ६३४ रुपयांच्या न वटलेल्या ४१९ धनादेशांचा समावेश आहे. आता या ग्राहकांच्या बाबतीत महावितरण काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनची सदस्य नोंदणी मैलाचा दगड ठरेल

## सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभप्रसंगी अ‍ॅड. जयप्रकाश बाविस्कर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**राजसाहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि जळगाव शहराच्या प्रश्नांवर सक्षमपणे लढण्यासाठी मनसेची ही सदस्य नोंदणी मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन अ‍ॅड. जयप्रकाश बाविस्कर यांनी केले.**




महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार, आज जळगाव शहरात मनसेच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानाचा उत्साहात प्रारंभ करण्यात आला. पक्षाचे ज्येष्ठ नेते अ‍ॅड. जयप्रकाश बाविस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. शहरातील मानाच्या समजल्या जाणाऱ्या काव्य रत्नावली चौकात सायंकाळी ५ वाजता या अभियानाला सुरुवात झाली. यावेळी मनसेच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. जय महाराष्ट्रच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. अ‍ॅड. बाविस्कर यांनी स्वत: उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आणि नोंदणी प्रक्रियेची पाहणी केली.

या नोंदणी मोहिमेत मनसेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, अंगीकृत संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी सेना, महिला सेना तसेच विभाग आणि शाखा अध्यक्षांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. येणाऱ्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

नोंदणीसाठी येणाऱ्या प्रत्येकाने सोबत पासपोर्ट साईज फोटो आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार, अनेक नवीन युवकांनी आणि महिलांनी उत्साहाने मनसेचे सदस्यत्व स्वीकारले. या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. जमील देशपांडे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे, उपजिल्हाध्यक्ष विनोद पटक, जळगाव महानगराध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळेले, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, राजेंद्र निकम, विभाग अध्यक्ष उमेश आठरे, विशाल जाधव, राहुल चव्हाण, दीपक राठोड, खुशाल ठाकूर, असुतोष जाधव, प्रदीप पाटील, विकास पाथरे, जितेंद्र पाटील, रज्जाक सय्यद, शाखाध्यक्ष युसूफ खाटीक, बादशाह शाह, पवन साफकळे, व सर्व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जळगाव शहर कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# खोटी हजेरी अन् गैरप्रकार खपवून घेणार नाही

## उपमहापौर मनोज चौधरी यांचा मनपा आरोग्य विभागाला इशारा

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर स्वच्छ आणि सुंदर बनवणे हे आपले प्राथमिक ध्येय आहे. स्वच्छता कामात कुठल्याही प्रकारचा नियमभंग, कर्मचाऱ्यांची खोटी हजेरी किंवा कामातील हलगर्जीपणा यापुढे अजिबात खपवून घेतला जाणार नाही, असा कडक इशारा उपमहापौर मनोज चौधरी यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला दिला आहे.**



शुक्रवारी महापालिकेतील उपमहापौर दालनात आरोग्य विभागाची महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. यावेळी उपमहापौरांनी सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक, युनिट प्रमुख आणि स्वच्छता निरीक्षक यांना कामात तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीत उपमहापौरांनी प्रामुख्याने कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर बोट ठेवले. कामगारांची हजेरी आता मुकादमांनी न घेता स्वच्छता निरीक्षकांनी स्वतः घ्यावी. यामुळे बोगस हजेरीला चाप बसेल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच जे कर्मचारी सतत गैरहजर राहतात किंवा कामात टाळाटाळ करतात, त्यांना अधिकाऱ्यांनी पाठीशी घालू नये, अशा कडक सूचनाही त्यांनी दिल्या.

शहरातील कचरा व्यवस्थापनाबाबत बोलताना उपमहापौर म्हणाले की, प्रत्येक भागात घंटागाडी नियमितपणे फिरली पाहिजे.

### स्वच्छता केवळ कागदावर नको

रस्ते आणि गटारींची स्वच्छता केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष दिसली पाहिजे. मक्तेदारांकडून होणारी अनियमितता रोखण्यासाठी प्रशासनाने अधिक दक्ष राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्वच्छतेच्या कामात खोटी माहिती देणे किंवा कर्तव्यात कसूर करणे महागात पडेल. यापुढे अशा बाबी निदर्शनास आल्यास कडक कायदेशीर किंवा प्रशासकीय भूमिका घेतली जाईल, असे सांगत उपमहापौरांनी अधिकाऱ्यांमध्ये शिस्त आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. या बैठकीमुळे आता जळगाव शहरातील स्वच्छता मोहिमेला नवी गती मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# विद्यापीठात क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**पीएम उषा अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र , कला व मानव विद्या प्रशाळेच्यावतीने दि. १८ मार्च रोजी विद्यापीठात क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. नॉलेज पार्टनर म्हणून क्रीडा भारती सहभागी होणार आहे.**

नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत शारीरिक शिक्षण व खेळ, संतुलित आहार, ,क्रीडा शासनाच्या योजना तसेच खेळातून रोजगाराच्या संधी याची माहिती देऊन भविष्यातील दिशा निर्माण करणे या दृष्टिकोनातून राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत अखिल भारतीय महामंत्री क्रीडा भारती पुणे येथील केशव चौधरी यांचे बीज भाषण होणार आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात क्रीडा धोरणांचा अंतर्भाव या विषयावर नागपूर येथील डॉ.निरव पांड्या, भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रा. दयानंद कांबळे, क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी या विषयावर जळगाव येथील क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक तर क्रीडा धोरणे आणि भारतीय क्रीडा सृष्टीचा विकास या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील अमृत बिराडे मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यापीठात होणाऱ्या एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार, क्रीडा भारतीचे जिल्हा मंत्री प्रशांत जगताप, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, प्रा.शरद पाटील, डॉ.संजय चौधरी, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ.सुरेश थरकुडे यांनी केले आहे.

## थोडक्यात

### पी.जि.महाविद्यालयात बक्षीस वितरण

**जळगाव ।** के. सी. ई. पी.जी महाविद्यालयात प्रोस्पेक्टिव्ह रिसर्च स्कीममध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण व पुस्तकाचे प्रकाशन डॉ.भूषण कवीमंडळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष. डॉ. व्ही.एस.झोपे व प्रमुख पाहुणे मु. जे .महाविद्यालयाचे जीव रसायन विभाग प्रमुख डॉ.भूषण कवीमंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.बी. महाजन, पी. आर. एस. समन्वयक प्रा. संदीप पाटील हे उपस्थित होते.

### जळगावात ल्युपस आजारावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**जळगाव ।** शहरातील महादेव हॉस्पिटल येथे गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सिस्टेमिक ल्युपस एरिथेमॅटोसस या गंभीर व जुनाट आजारावर विशेष परिसंवाद आणि मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी संधिवात तज्ज्ञ डॉ. आस्था अग्रवाल आणि ग्रंथीशास्त्र तज्ज्ञ डॉ. चिमु चिंते यांनी उपस्थितांना या आजाराचे स्वरूप, लक्षणे आणि आधुनिक उपचार पद्धतींबाबत सविस्तर माहिती दिली. परिसंवादात मार्गदर्शन करताना डॉ. आस्था अग्रवाल व डॉ. चिमु चिंते यांनी सांगितले की, सिस्टेमिक ल्युपस एरिथेमॅटोसस हा एक ऑटोइम्यून आजार आहे. यामध्ये शरीरातील रोगप्रतिकारशक्ती चुकून स्वतःच्याच निरोगी पेशींवर हल्ला करू लागते. सोप्या भाषेत सांगायचे तर, शरीराची सुरक्षा यंत्रणा स्वतःच्याच अवयवांना शत्रू समजून त्यांच्यावर प्रहार करते. हा आजार सिस्टेमिक असल्याने त्वचा, सांधे, किडनी, हृदय किंवा मेंदूवर परिणाम होऊ शकतो.

### राष्ट्रीय एकता शिबीर उत्साहात

**जळगाव ।** भारत सरकार, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, नवी दिल्ली आणि चौधरी देवीलाल विद्यापीठ शिरसा, हरियाणा यांच्या संयुक्त विद्यमानाने, शिरसा येथे दि. ६ ते १२ मार्च राष्ट्रीय एकता शिबिर संपन्न झाले. या शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ सहभागी झाला. संघ व्यवस्थापक प्रा. विजयकुमार वाघमारे यांच्या सह स्वयंसेवक ऋषिकेश पारधी, धिरज पवार, रोहित गिरासे, मंगेश शिंपी, चेतन वसावे, प्रांजल मराठे, तेजस्विनी गोराने, रिदम जावरे, वैष्णवी पाटील, शिल्पा पाडवी यांनी सहभाग नोंदवला. देशभरातून १६ राज्यातून राष्ट्रीय सेवा योजनाचे २०० स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. राज्यातून सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात आले.

# जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून जिल्ह्यात २७ ठिकाणी खोडा शेडचे बांधकाम सुरू

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील पशुधनावर उपचार करताना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना सोयीचे जावे तसेच पशुधनाचे ऊन, वारा व पावसापासून संरक्षण व्हावे, या उद्देशाने जिल्हा परिषद जळगावतर्फे महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून जिल्ह्यात २६ ठिकाणी खोडा शेड उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.**




या कामासाठी जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून ४९ लाख ५० हजार रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जिल्ह्यातील विविध पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या पशुधनाला उन्हापासून, वाऱ्यापासून तसेच पावसापासून संरक्षण मिळावे. तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना उपचार प्रक्रिया अधिक सोयीस्कर व्हावी, या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या निधीच्या माध्यमातून जिल्ह्यात एकूण २६ खोडा शेड उभारण्यात येत असून त्यापैकी काही शेडचे बांधकाम पूर्ण झाले आहे, तर उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. या सुविधेमुळे पशुधनाच्या उपचारांसाठी अधिक चांगले व सुरक्षित वातावरण उपलब्ध होणार असून पशुपालकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

जिल्हा परिषद जळगावच्या माध्यमातून पशुसंवर्धन क्षेत्रात विविध सुविधा निर्माण करून पशुपालकांना मदत करण्याचा प्रयत्न सातत्याने करण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

### मू. जे. महाविद्यालयातर्फे पर्यावरण जनजागृती सर्वेक्षण

प्रतिनिधी । जळगाव

मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव येथे समाजशास्त्र विभाग आणि महानगरपालिका पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण जनजागृती सर्वेक्षण यासंदर्भात मार्गदर्शनपर सत्र आयोजित केले होते. सर्वेक्षण सत्राला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मनपा शाखा अभियंता प्रकाश पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केसीई सोसायटीच्या शैक्षणिक संचालिका डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. प्रकाश पाटील यांनी घरातील कचरा व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

# जलवाहिनी कामाचा नागरिकांना फटका; दुचाकी अपघातात महिला जखमी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील चौघुले प्लॉट भागात प्रशासनाच्या संथ कारभारामुळे नागरिकांच्या जिवावर बेतण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसांपासून जलवाहिनी टाकण्याचे काम अत्यंत कासवगतीने सुरू असून, शुक्रवारी या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे एक महिला दुचाकीवरून पडून किरकोळ जखमी झाली.**

### ➤ कामाचा वेग कासवगतीने

चौघुले प्लॉट भागात नळांना पाणी येत नसल्याची तक्रार अनेक दिवसांपासून नागरिकांची होती. त्यावर उपाय म्हणून नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र, हे काम ज्या वेगाने व्हायला हवे होते, त्याऐवजी ते अत्यंत संथगतीने सुरू आहे. रस्ता खोदून ठेवल्यामुळे स्थानिक रहिवाशांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

शुक्रवारी सकाळी चौघुले प्लॉटकडून कांचननगराकडे एक दुचाकीस्वार जात होता. रस्ता खोदल्यामुळे सर्वत्र सिमेंटचे दगड आणि माती पसरली आहे. या खडबडीत रस्त्यावरून जाताना दुचाकीस्वाराचा तोल गेला आणि मागे बसलेली महिला थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारीजवळ पडली. या अपघातात महिलेला किरकोळ दुखापत झाली आहे.

# रामलक्ष्मण नगरात देवी भागवत कथेची सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील गाडगेबाबा चौकातील रामलक्ष्मण नगर येथे पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून यंदा संगितय श्रीमद देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.**

देवी भागवत कथा प्रारंभ दि. १० ते १६ मार्चदरम्यान पहाटे काकड आरतीसह संध्याकाळी ७ ते १० श्रीमद देवी भागवत कथा ह.भ.प.राष्ट्रीय युवा किर्तनकार गजानन महाराज धानोरेकर यांच्या श्रीमुखातून भक्तांना ऐकण्यास मिळत आहे. पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या भव्य प्रागंणात पवित्र देवी भागवत कथेचा शुभारंभ भक्तिमय वातावरणात करण्यात आला आहे. श्रीमद देवी भागवत कथेच्या सप्ताहाची सुरुवात देवीची पूजा-अर्चना व मंत्रोच्चाराने करण्यात आली. परिसरातील अनेक भाविकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून कथेचा लाभ घेत आहे. या प्रसंगी ह.भ.प.युवाराष्ट्रीय किर्तनकार गजानन महाराज धानोरेकर यांनी देवीच्या महात्म्यांचे ओघवत्या व प्रभावी शब्दांत सादरीकरण करीत आहे. भक्तगण श्रद्धेने कथा ऐकत देवीच्या चरणी प्रार्थना करत आहे. कथेच्या ठिकाणी दररोज देवीच्या रुपाचे सादरीकरण परिसरातील महिला वर्गांच्या वतीने केले जात असून देवी भागवत कथेचे आयोजन समस्त रामलक्ष्मण नगर परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने १७ मार्च रोजी ११ ते ३ यावेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# जळगावात गॅस सिलिंडरसाठी नागरिकांची वणवण; एजन्सींचे फोन बंद

प्रतिनिधी । जळगाव

सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थिती तणावपूर्ण असताना गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याबाबत अफवा पसरत आहेत. अशा परिस्थितीत जळगाव शहरात मात्र नागरिकांना प्रत्यक्षात सिलिंडरसाठी मोठी धावपळ करावी लागत असल्याचे चित्र दिसत आहे. शहरातील अनेक गॅस एजन्सींना फोन करूनही प्रतिसाद मिळत नाही. तसेच बुकिंग करूनही वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एजन्सींकडून फोन उचलण्यास टाळाटाळ केली जात असून काही ठिकाणी सिलिंडरसाठी जादा पैसे आकारले जात असल्याचाही आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे आधीच सिलिंडर संपलेल्या कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी गेल्या दोन दिवसांपूर्वी नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले होते. मात्र, प्रत्यक्षात शहरात अनेकांनी बुकिंग करूनही वेळेवर सिलिंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

कोल्हे हिल्स परिसरातील एका नागरिकाने संबंधित एजन्सीविरोधात तक्रार केल्याची चर्चा देखील समोर आली आहे. जळगाव शहरापासून काही अंतरावर कालिका माता मंदिर रोडलगत असलेल्या एका भारत गॅस एजन्सीला नागरिकांनी सलग तीन दिवस फोन करूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित एजन्सींची तपासणी करून नागरिकांना वेळेवर सिलिंडर घरपोच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### बुधवारी सकल हिंदू समाजाचा मेळावा

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील मेहरुण परिसरातील रामेश्वर कॉलनीतील स्वामी समर्थ केंद्र चौकात दि.१८ मार्च रोजी रात्री ८ वाजता विखुरलेल्या हिंदू समाजाला एकत्रित करण्यासाठी हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याला सद्गुरू दादा महाराज चातुर्मास्ये संस्थान अनवा पंढपूरचे हभप पराग महाराज यांचे मार्गदर्शन होणार आहे. विश्व हिंदु परिषदेचे आंतरराष्ट्रीय संघटन मंत्री मिलींद परांडे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

# प्रकाश तेलींच्या शाश्वत विचार या २० व्या ग्रंथाचे पद्मश्री चैत्राम पवार यांचे हस्ते प्रकाशन



प्रतिनिधी । जळगाव

दर्जेदार व अनोखे साहित्य लेखानात निष्णात असलेले कवी, लेखक, पत्रकार आणि गीतकार प्रकाश तेली यांच्या शाश्वत विचार या २० व्या ग्रंथाचे प्रकाशन पद्मश्री चैत्राम पवार व मान्यवरांच्या हस्ते घरगुती वातावरणात व साध्या पध्दतीने जळगांव येथे संपन्न झाले.

शाश्वत विचार या ग्रंथाच्या प्रकाशन प्रसंगी अनिल पाटील, प्रकाश तेली, योगीता तेली, अ‍ॅड. किरण तेली, आर्यन तेली, आर्या तेली व अन्य उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनप्रसंगी वार्तालाप करतांना पद्मश्री चैत्राम पवार यांनी प्रकाश तेली यांच्या साहित्य कार्याचे तोंडभरून कौतुक केले व साहित्य कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पद्मश्री चैत्राम पवार यांनी प्रकाश तेली यांना आपल्या मूळगावी संपूर्ण कुटुंबासह मुक्कामी येण्याचे निमंत्रण दिले. प्रकाश तेली यांचे साहित्य कार्य आगळेवेगळे असून ते जीवनाला दिशा देणारे आहे, असे गौरवोद्गार पद्मश्री चैत्राम पवार यांनी ह्याप्रसंगी काढले.

शाश्वत विचार या ग्रंथामध्ये अनेक अभिनव व वास्तव विचार आहेत, हे विचार जीवनाचे सार सांगण्यासोबत जीवनात नवचैतन्य निर्माण करतात. जीवनात यशाची शिखरे गाठायची असतील आणि नकारात्मकतेवर मात करायची असेल, तर शाश्वत विचार हा ग्रंथ प्रत्येकाजवळ संग्रही असायलाच पाहिजे. शाश्वत विचार हा ग्रंथ केवळ शब्दांचा संग्रह नसून ते एक वास्तववादी लिखाण आहे. आजच्या काळात समाजाला अशा सकारात्मक साहित्याची गरज आहे.

सजीवसृष्टीवरील काही गोष्टी, घटना, विचार हे शाश्वत आणि अपरिवर्तनीय आहेत. याच गोष्टी शाश्वत विचार या ग्रंथाचा प्रेरणाश्रोत आहेत. शाश्वत विचार हा ग्रंथ प्रेरणा देण्याचे, धारणा बदलण्याचे व मनोकामना कशी पूर्ण होते याबद्दल माहिती देतो. शाश्वत विचार हा ग्रंथ अनेक उद्देश डोळ्यासमोर ठेवून लिहिलेला असला तरी, प्रत्येक सजीवांचे जीवन सुसह्या व्हावे हा मुख्य उद्देश या ग्रंथ लिहिण्यामागे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकाश तेली यांचे १९ ग्रंथ प्रकाशित झाले असून गौरवशाली साहित्य प्रवास आहे.

# जि.प.च्या माध्यमातून शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ

## जिल्ह्यातील ८ शेतकऱ्यांना ड्रोन तर ८७ शेतकऱ्यांना स्लरी फिल्टरचे वाटप

प्रतिनिधी । जळगाव

**शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान उपलब्ध करून देऊन शेती अधिक उत्पादनक्षम व किफायतशीर करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद जळगावच्या कृषी विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.**



या उपक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन व स्लरी फिल्टर या आधुनिक उपकरणांचा पुरवठा करण्यात येत आहे. शेतीमध्ये औषध फवारणी अधिक अचूक, जलद व कमी खर्चात करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान उपयुक्त ठरत असून सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी स्लरी फिल्टरचा वापर प्रभावी ठरत आहे. जिल्हा परिषद जळगावने आपल्या सेस निधीतून ड्रोन खरेदीसाठी ५५ लक्ष रुपये तसेच स्लरी फिल्टरसाठी १४ लक्ष रुपये अशी आर्थिक तरतूद केली आहे. या माध्यमातून आतापर्यंत जिल्ह्यातील ८ शेतकऱ्यांना ड्रोन तर ८७ शेतकऱ्यांना स्लरी फिल्टर यांचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळून शेतीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून जिल्ह्यातील शेती अधिक प्रगत व शाश्वत करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# चोपड्यात इंधनसाठा मुबलक; नागरिकांनो, संयमाने घ्या : तहसीलदार भाऊसाहेब थोरात

## गॅस एजन्सी, पेट्रोल पंपधारकांची घेतली बैठक

प्रतिनिधी । चोपडा

**सद्य:स्थितीत आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युध्दाच्या पार्श्वभूमीवर चोपडा तालुक्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. त्यामुळे चोपडा तालुक्यामध्ये कार्यरत सर्वसाधारणपणे सर्वच गॅस एजन्सी व पेट्रोल पंपावर अतिरीक्त स्वरुपामध्ये गर्दी दिसून येत आहे. तरी अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी संयमाने घ्यावे, असे आवाहन आयोजित बैठकीतून तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांनी केले आहे**



त्यांनी म्हटले आहे की,चोपडा तालुक्यामध्ये गॅस सिलिंडर, पेट्रोल व डिझेलचा साठा सद्य:स्थितीत पर्याप्त प्रमाणामध्ये उपलब्ध असून नागरिकांना इंधनाचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. सर्वच गॅस व पेट्रोल पंप कंपनीच्या विक्री अधिकारी / प्रतिनिधींना प्रशासनामार्फत इंधन पुरवठा सुरळीत ठेवणेकामी आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तालुक्यातील सर्व गॅस एजन्सी व पेट्रोल पंपधारकांची बैठक दि. १३ मार्च रोजी आयोजित करुन इंधन पुरवठा सुरळीत ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

चोपडा तालुक्यात कोणत्याही प्रकारचा गॅस सिलिंडर, पेट्राल व डिझेलचा तुटवडा नाही. सर्व गॅस एजन्सी व पेट्राल पंपावर नियमितपणे इंधनाचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊन गॅस एजन्सी व पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी करणे योग्य होणार नाही. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी तालुका प्रशासनाशी संपर्क साधावा. चुकीची माहिती पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# प्रभाग क्रमांक १५ मध्ये मुलींसाठी एचपीव्ही कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण शिबिराचा शुभारंभ

प्रतिनिधी । जळगाव

**मुलींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि भविष्यात होणाऱ्या गंभीर आजारांपासून त्यांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने प्रभाग क्रमांक १५ मध्ये मुलींसाठी कॅन्सर प्रतिबंधक एचपीव्ही लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. दि.१३ मार्च रोजी कै. नानीबाई अग्रवाल दवाखाना येथे या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.**



या शिबिरात १४ वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लस देण्यात आली. ही लस महिलांमध्ये होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग या अत्यंत घातक आजाराच्या प्रमुख प्रकारांपासून संरक्षण देण्यासाठी प्रभावी मानली जाते. भविष्यात महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगाच्या धोक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी या लसीकरणाचे मोठे महत्त्व असल्याचे यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले. या कार्यक्रमाला डॉ. राम रावलानी, डॉ.कुलकर्णी, नगरसेवक अरविंद देशमुख, प्रकाश बालाणी, रेश्मा कुंदन काळे, चेतना शिरसाळे, रितेश ढेकळे आदी मान्यवर उपस्थित होते. लसीकरण शिबिर यशस्वी होण्यासाठी वैद्यकीय पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामध्ये डॉ. सोनल जोशी, डॉ. निकिता काळे, परिचारिका हर्षद कुलकर्णी व संपूर्ण स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### हिंदू नववर्ष स्वागत यात्रेनिमित्त आज बैठक

**अमळनेर ।** सालाबादाप्रमाणे या वर्षी देखील हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे अमळनेर शहरातील राष्ट्रप्रेमी, धार्मिक, सामाजिक संस्थांच्या व मंडळांच्या सहकार्याने भव्य नववर्ष स्वागत यात्रा दि. १९ मार्च रोजी गुढीपाडवानिमित्त काढण्यात येणार आहे. स्वागत यात्रेचे हे २२ वे वर्ष असून या यात्रेनिमित्ताने आयोजनासाठी रविवार दि. १५ मार्च रोजी रात्री ८ वा. बन्सीलाल पॅलेस, अमळनेर येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्वांनी मित्र परिवारासह आवश्य उपस्थित राहावे असे विनम्र आवाहन हिन्दू नववर्ष स्वागत समिती, अमळनेरतर्फे करण्यात आले आहे.

### कोसगाव येथे विठ्ठल मंदिरात संकीर्तन सोहळा

**यावल ।** तालुक्यातील कोसगाव येथे श्री विठ्ठल मंदिर कोसगाव च्या श्री पांडुरंगाच्या ३२व्या वर्धापन दिनानिमित्ताने अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा दि.१३ मार्च ते २० मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आलेला असल सकाळी दैनंदिन पाच ते सहा काकड आरती संध्याकाळी पाच ते सहा विभाग रात्री आठ ते दहा हरिकीर्तन असे कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. या कालखंडात वैकुंठवासी हरिभक्त परायण जगन्नाथ महाराज अंजाळेकर आणिहरिभक्त परायण गुरुवर्य श्री शारंगधर जी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आठ दिवस हरी किर्तन रात्री आठ ते दहा या कालखंडात होणार आहे त्यात महेश महाराज पाडळसे मनोहर महाराज ओझरखेडा किशोर महाराज तळवेल प्रल्हाद महाराज शास्त्री सिन्नर बबन महाराज पिंपळे सिम निवृत्ती महाराज शिंपी शिरसोली गोपाल महाराज दापोरीव २० मार्च रोजी गुरुवर्य शारंगधर जी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

# बाळकृष्ण सोनवणे यांचा भा. रा. तांबे पुरस्काराबद्दल गौरव

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील मल्हार पुरा भागात राहणारे कवी बाळकृष्ण सोनवणे यांना बहुप्रतिष्ठित भा. रा. तांबे पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव चोपड्यात करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे (शाखा) चोपडाचे संचालक रमेश जे. पाटील, भगवान भाऊलाल उर्फ छोटू वार्डे यांनी त्यांचे निवासस्थानी जाऊन शाल व पुस्तक देऊन त्यांचा गौरव केला.**



बाळकृष्ण सोनवणे यांना नुकताच मध्य प्रदेशातील भोपाल येथे मराठी साहित्य अकादमी द्वारा एका विशेष कार्यक्रमात ५१ हजार रुपये रोख शाल व मानपत्र देऊन भा.रा. तांबे पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर त्यांचा येथे सत्कार करण्यात आला.

# डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात 'नो स्मोकिंग डे' निमित्त जनजागृती

प्रतिनिधी । जळगाव

**एक सिगारेट आयुष्य कमी करत असेल, पण धूम्रपान न करण्याचा एक निर्णय आयुष्य वाचवू शकतो, असे प्रभावी प्रतिपादन प्रा. डॉ. दयाघन राणे यांनी केले. भुसावळ येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे नुकताच नो स्मोकिंग डे कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.**




रोटरी क्लब ऑफ भुसावळ आणि डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्याचे जळगाव जिल्हा संघटक तसेच नाशिक विभागीय संघटक प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. दयाघन राणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे वैद्यकिय संचालक डॉ. एन. एस. आर्वीकर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, हृदयरोग तज्ञ संचालक, डॉ. वैभव पाटील, स्त्रीरोग शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सौ. माया आर्वीकर तसेच प्राध्यापक वर्ग आणि एम.बी.बी.एस. चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना प्रा. डॉ. दयाघन राणे यांनी तंबाखू व सिगारेट सेवनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम, व्यसन कसे लागते आणि त्यातून अनेक गंभीर आजार कसे निर्माण होतात याची माहिती त्यांनी विविध सर्वेक्षणांच्या आधारे स्पष्ट केली. तंबाखूमुळे कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार तसेच श्वसनाचे गंभीर विकार होण्याचा धोका वाढतो,असा धूम्रपानमुक्त जीवनाचा संदेश दिला.

# चोपडा येथे महारक्तदान शिबिरात ८० रक्त पिशव्यांचे संकलन




प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित महारक्तदान शिबीर उत्साहात पार पडले. या रक्तदान शिबिरास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला. यावेळी ८० रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.**

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ. अशोक कदम व डॉ. पराग पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.के.एन. सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.ए. बी. सूर्यवंशी, प्रा.डॉ.आर.एम.बागुल, समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ, प्रबंधक डी.एम. पाटील, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. अभिजीत साळुंखे व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या शिबिरात रक्तसंकलन करणेकरिता जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून रक्त संक्रमण अधिकारी डॉ. विद्या शिरसाठ, डॉ. श्वेता वळवी, प्रदीप पाडवी, विनायक वैद्य व त्यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. याप्रसंगी मान्यवरांचे व्यवस्थापन विभागाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ यांनी उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व आणि महात्म्य समजावून सांगितले. तसेच प्राचार्य प्रा.डॉ.के. एन.सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात रक्तदानाची समाजासाठी गरज याबाबत मार्गदर्शन करताना कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन बाविस्कर यांनी केले.

# गॅस दरवाढीचा अमळनेर काँग्रेसतर्फे निषेध

प्रतिनिधी । अमळनेर

केंद्रातील भाजप सरकारने केलेल्या गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसत असून दरवाढ मागे घ्यावी या मागणीचे निवेदन प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना काँग्रेसतर्फे देण्यात आले. सरकारने केलेली गॅस दरवाढ तत्काळ मागे घ्यावी अन्यथा मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा निवेदनाद्वारे काँग्रेसतर्फे देण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष बी.के.सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, महिला जिल्हाध्यक्ष सुलोचना वाघ, संदीप घोरपडे, तौसिफ तेली, डॉ. रवींद्र पाटील, मगन पाटील, राजेंद्र चौधरी, बन्सीलाल भागवत उपस्थित होते.

# धरणगावात आज मोफत डोळे तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील गरजू नागरिकांना डोळ्यांचे आजार वेळेत ओळखता यावेत तसेच मोतीबिंदूग्रस्त रुग्णांना मोफत उपचार मिळावेत, या उद्देशाने प्रथमभाऊ सूर्यवंशी मित्र परिवार यांच्यावतीने मोफत डोळ्यांची तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

हे शिबिर दि. १५ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत राजपूत मंगल कार्यालय, धरणगाव येथे होणार आहे. या शिबिरासाठी शंकर आय हॉस्पिटल, आनंद (गुजरात) येथील तज्ज्ञ डॉक्टरांचे सहकार्य लाभणार असून रुग्णांची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. या शिबिरात मोतीबिंदू (कॅटॅरॅक्ट) असलेल्या रुग्णांचे टाके न घालता आधुनिक पद्धतीने इम्पोर्टेड लेन्स बसवून मोफत ऑपरेशन करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांसाठी राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था देखील करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांनी आधार कार्ड झेरॉक्स व मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी निशांत जनरिक मेडिकल, मो. ८८०६५४५३५१ येथे संपर्क साधावा. या शिबिरासाठी काकासट मित्र मंडळ, शेंडी ग्रुप तसेच महाराणा प्रतापसिंहजी चौफुली समिती, यांचे सहकार्य लाभत आहे. गरजू रुग्णांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मंगरूळ येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या शाखेचे फित कापून उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

**येथून जवळच असलेल्या मंगरूळ, ता चोपडा येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शाखेचे फित कापून उद्घाटन करण्यात आले यावेळी धरणगाव येथील राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे व मंगरूळचे सरपंच तथा चोसाका अध्यक्ष अतुल ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.**



या कार्यक्रमाचेप्रमुख पाहुणे म्हणून चोपडा तालुका अध्यक्ष सोपान मोरे, सचिव रोहिदास मोरे, जितेंद्र विसावे, निलेश वाघ, वनोद खजुरे, विकी अहिरे, सचीन विसावे, सुनिल बडगुजर, सुमित बडगुजर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा सत्कार मंगरूळ येथील शंकर महाले, भागवत विसावे, भटू विसावे, रविंद्र विसावे, रविंद्र सोनवणे, चंद्रशेखर ठाकरे, प्रविण विसावे, विश्वास सोनवणे, भिक्कन विसावे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चर्मकार समाजाचे राष्ट्रीय कार्यअध्यक्ष भानुदास विसावे यांनी सांगितले की, समाज एक जुट झाला पाहिजे. तसेच चर्मकार समाज हा देशात एक नंबर आहे. आपण आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांना शिकु दया. तसेच या गावात संत रविदास समाज मंदिर झाले पाहिजे, असे अनेक विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी येथील सरपंच व चोसाका अध्यक्ष अतुल ठाकरे यांनी ही चर्मकार समाजासाठी व समाज मंदिरासाठी जागा देवू तसा ठराव करून देतो, असे आश्वासन दिले. यावेळी गावातील सर्व महिला व पुरुष बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन सोपान मोरे व आभार अतुल ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी भटू विसावे शंकर महाले, भागवत विसावे, प्रविण विसावे, विश्वास सोनवणे, भिक्कन विसावे, विश्वास सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

# गणपूरचे टरबूज पोहोचले राजस्थान, हरियाणात!

## नरेश पाटील यांनी केली अडीच महिन्यात तेरा लाखांची कमाई!

प्रतिनिधी । गणपूर, ता. चोपडा

टरबूज, खरे तर बागायतदार शेतकऱ्यांसाठी रिस्की पीक. पूर्ण पक्व होऊनही हातात काय येईल हे सांगणे तसे कठीण! मात्र गणपूर येथील नरेश शांताराम पाटील या युवा शेतकऱ्याने तीन एकर क्षेत्रात लागवड केलेल्या टरबुजापासून अवघ्या ७५ दिवसात १३ लाखांची कमाई केली असून या क्षेत्रात असलेल्या आणि येऊ पाहणाऱ्या तरुण वर्गासाठी ही बाब उभारी देणारी अशीच आहे.

नरेश पाटील यांनी वडील शांताराम तोताराम पाटील, बंधू भास्कर पाटील यांच्या मदतीने दि.२९ नोव्हेंबर २०२५ ला खडके बुद्रुक (ता.एरंडोल) येथून सुरभी नर्सरी मधून रवी हायब्रीड सीडच्या सुपर बंन्नी या वाणाची १८ हजार रोपे आणून त्याची तीन एकर क्षेत्रात लागवड केली. पीक ७५ दिवस शेतात असताना वेळेवर आणि आज नव्हे तर आत्ताच याप्रमाणे खते, मायक्रो न्यूट्रेन, वॉटर सोल्युबल खते, कीडनाशक वेळेवर फवारून अवघ्या ७५ दिवसात केलेल्या प्रयोगाचे फलित प्रयत्नांना फळ देणारे ठरले आहे. त्यांच्या शेतात असलेल्या सुपर बन्नी या टरबुजांची विक्री त्यांनी चोपडा येथील व्यापारी रियाज भाई यांना एक नंबर माल वीस रुपये प्रति किलो तर दोन नंबर माल साडेसात रुपये प्रति किलो याप्रमाणे विकला. एकूण तीन एकर क्षेत्रात त्यांनी ५८ टन माल वीस रुपये भावाने तर १७ टन दोन नंबर माल साडेसात रुपये भावाने विकला. राहिलेला उर्वरित माल ठराविक रकमेवर विकून तीन एकर क्षेत्रात अवघ्या अडीच महिन्यात १३ लाखांचे उत्पन्न घेऊन या क्षेत्रात एक प्रयोगशील शेतकरी म्हणून नावलौकिक कमावला आहे. पीक घेत असताना त्यांना सोलोफाईन कंपनीचे विनायक पाटील तर सुरभी नर्सरीचे भूषण बोरसे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी सुरुवातीला सरी काढून त्यावर प्लास्टिक मल्चिंग अंथरले आणि टरबुजाची रोपे आणून त्यांची लागवड केली. साधारणपणे एका वेलीला दोन टरबूज चांगल्या प्रकारे पोसले जातील, अशा प्रकारे खतांचे नियोजन केले. टरबूज निघाल्यानंतर पुन्हा त्याच बेडवर टरबूज लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून या पिकात त्यांनी त्यांचे कसब सिद्ध केले आहे.



**पिकासाठी योग्य नियोजन केल्यास आणि वेळेवर मार्गदर्शनानुसार सर्व खते व मायक्रोन्यूट्रॉन चा पुरवठा केल्यास चांगल्या प्रकारचे उत्पन्न घेणे सहज शक्य आहे. मात्र त्यासाठी वातावरणाची साथ हवी. हे तेवढेच खरे आहे.**

**- नरेश शांताराम पाटील,**
टरबूज उत्पादक,
गणपूर ता चोपडा

### पिकासाठी लागलेला खर्च...

- खते, वॉटर सोल्युबल खते, मायक्रोन्यूट्रॉन, कीडनाशक आदी : ९० हजार रुपये.
- सरी पाडणे व मल्चिंग अंथरणे : २२ हजार रुपये
- टरबूज रोपे: १८ हजार रुपये
- इतर : ४२ हजार रुपये. अशाप्रकारे खर्च केला असून बागेची उत्तम प्रकारे निगा राखत आणि दररोज बारीक निरीक्षण करून टरबूजाचे पिक पिकवले आहे.